औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या बुधवार दि. ५.२.१९९२ रोजी झालेल्या ७० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| [१] | श्री. ईश्वर भोसीकर | :- | सभापती, औरंगाबाद मंडळ. |
| [२] | श्री. विजय देशमाडे | :- | उपसभापती, औरंगाबाद मंडळ. |
| [३] | श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणकर. | :- | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| [४] | श्री. राजभोज, कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद. | :- | सदस्य प्रतिनिधी. |
| [५] | श्री. दे. हि. मुन, उप संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण औरंगाबाद विभाग. | :- | सदस्य. |

विषय क्र. १:- दिनांक ३१.१२.९१ रोजी झालेल्या ६९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ४१९:

मंडळाच्या ६९ व्या बैठकीत कार्यवृत्तांत वाचून दाखविण्यात आला व सविस्तर चर्चा होऊन दिनांक ३१.१२.१९९१ रोजी झालेल्या ६९ व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २:- औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने म्हाळजा नांदेड येथे बांधलेल्या २१० गाळयाचे बिडी कामगारांना वितरीत करण्यात येणाऱ्या गाळयाबाबत.

ठराव क्र. ४२०.

बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेल्या सर्व बाबीवर विस्तुत चर्चा होऊन मंडळाने बिडी कामगारांची आर्थिक परिस्थिती व पैसे भरण्याची क्षमता लक्षात घेता, बिडी कामगारांना, बाब टिप्पणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे व प्रस्तावित केल्याप्रमाणे, पैसे भरण्यासाठी सुट देण्यात यावी अशा ठरावास मंडळाने मंजूरी दिली.

विषय क्र. ३:- सिडको औरंगाबाद येथील मंडळाच्या वसाहतीचे पाणीपुरवठा देयक अदा करणे बाबत.

ठराव क्र. ४२१:

मंडळाने उपरोक्त विषयावरील बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा करुन, मंडळाच्या नविन योजनांना त्वरीत पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी मागणी केलेली रक्कम रु. ७, ३७, ८९०/-महानगरपालिकेकडे हरकत नोंदवून त्वरीत भरणा करावी असा ठराव मंजूर केला.

विषय क्र. ४:- लातूर येथील गृहनिर्माण योजना.

ठराव क्र. ४२२:

मंडळाने उपरोक्त विषयावरील बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा करुन लातूर शहरात उद्भवणारी घरांची संभाव्य टंचाई लक्षात घेता, लातूर येथे मंडळाकडे प्राप्त असलेल्या जमिनीवर [बाब टिप्पणीमध्ये नमुद केलेल्या] गृह निर्माण योजना त्वरीत राबवाव्यात असा ठराव मंजूर केला.

विषय क्र. ५: मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १:- औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अत्यल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजने अंतर्गत परभणी येथे बांधलेल्या ५९४ गाळयांच्या वसाहतीतील खुली जागा सुगत शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी यांना वाटप करणे बाबत.

ठराव क्र. ४२३:

मंडळाने उपरोक्त विषयावरील बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा करुन "सुगत शिक्षण प्रसारक मंडळ परभणी" यांना परभणी येथील अत्यल्प उत्पन्न गट [५९४ गाळे] योजने अंतर्गत वसाहतीतील खुली जागा वाटप करण्यासंबंधीचा प्रस्ताव प्राधिकरण मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी पाठवावा असा निर्णय मंडळाने घेतला. तथापी, प्राधिकरणाकडून सदरील खुली जागा "सुगत शिक्षण प्रसारक मंडळास" देण्यासंबंधीचा मंजूरीचे आदेश येत नाहीत तोपर्यंत सदरची मोकळी जागा सुरक्षीत ठेवावी व त्यावर अनधिकृत बांधकाम वगैरे होवू देऊ नये असेही मंडळाने सुचविले.

विषय क्र. २:- स. नं. ४८८ जालना येथे बिडी कामगारांसाठी बांधलेल्या ३५३ गाळयाच्या वाटपाबाबत.

ठराव क्र. ४२४:

वरील विषयावरील बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन व सदरच्या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या गाळयाच्या वाटपास अडचण निर्माण होऊ नये व तसेच जास्तीचा विलंब होवू नये म्हणून मंडळाने असा ठराव मंजूर केला की, बाहय विद्युती करण्याकरिता लागणा-या रक्कमेचा भरणा मंडळाने, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे करावा व तद्नंतर, नगर-पालिका, जालनाकडे बाहय विद्युतीकरणापोटी भराव्या लागणा-या रक्कमेची मागणी करावी व त्याचा पाठपुरावा देखील करावा. तसेच या खर्चाची नोंद गाळयांच्या विक्री किंमतीत करण्यात यावी असेही मंडळाने सुचविले.

विषय क्र. ३:-पंचवटी नासिक येथील उच्च उत्पन्न गट १८ गाळे व १६ दुकानांची योजना.

खिडक्याच्या फुटलेल्या काचा नविन बसविण्याचे पेमेंट मिळणे बाबत.

ठराव क्र. ४२५:

वरील विषयावरील बाब टिप्पणीवर विस्तृत चर्चा झाली. १८ गाळे उच्च उत्पन्न गट[गृहनिर्माण योजना] हे, एक रकमी पध्दतीवर वाटप करावयाचे होते व त्यामुळे सदरचे गाळयास अल्प प्रतिसाद होता म्हणून बरेच दिवस वाटप होवु शकले नाही. जवळच्याच झोपडपट्टी वसाहतीमुळे गाळयाच्या खिडक्याच्या काचा फुटलेल्या आहेत. सदरील गाळयांच्या बांधकामाचे काम ठेकेदाराने पूर्ण करुन [तदनंतर एक वर्ष पर्यंत देखरेखीची जबाबदारी ठेकेदाराची] मंडळाकडे हस्तांतरीत केले.* परंतू नंतरच्या काळात मंडळाकडून सदरील गाळयाचे संरक्षण होवू शकले नाही. कारण मंडळाकडे राखण व संरक्षण करण्यासाठी कर्मचारी उपलब्ध नाही. म्हणुन ज्या ज्या ठिकाणी काचा फुटलेल्या आहेत त्या त्या ठिकाणी नविन काचा बसवून घेण्याचे काम ठेकेदाराकडूनच करुन घेतले होते, त्यामुळे सदरील जादा होणा-या खर्चाची परिपुर्ती ठेकेदारास करणे आवश्यक आहे. व हे काम ठेकेदाराने गाळे वाटप करण्यापुर्वी करुन दिलेले आहे. म्हणुन मंडळाने असा ठराव मंजूर केला की, खिडक्यांच्या फुटलेल्या काचा बदलून

* सदर देखरेखीचा खर्च ठेकेदारास ठराव क्र. अन्वये देण्यात येतो.

नविन काचा बसविण्यासाठी झालेल्या खर्चाची अदायगी करण्यात यावी. कार्यकारी अभियंता, नासिक यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसारच देयक तपासून खर्चाची अदायगी करावयाची आहे.

विषय क्र. ४:- मनमाड व अमळनेर नगरपालिकेकडून आलेल्या झोपडपट्टी सुधारणा कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत.

ठराव क्र. ४२६:

मनमाड व अमळनेर नगरपालिकेने झोपडपट्टी सुधारणेचा प्रस्ताव सादर केलेली अंदाजपत्रके अनुक्रमे बुरकुलवाडी [रु. ३,६२,४२७/-] व भंगीवाडा [जुना धुळे रस्ता [रु. ६,४६,९२६/-] रकमेची असून त्यास बुरकुलवाडी [मनमाड] रु. १,८०,८५०/- व भंगीवाडा [धुळे] रु. ७४,२५०/- रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यास मंडळाने मंजूरी दिली. परंतू सदरील झोपडपट्टी सुधारणेची कामे संबंधीत नगरपालिकेने लवकरात लवकर पूर्ण करावी असेही मंडळाने सुचविले.

विषय क्र. ५:- "क" वर्ग नगरपरिषदेच्या हद्दीत गृहनिर्माण योजना राबविणे बाबत.

कंधार जि. नांदेड येथील वैभवनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता "म्हाडा" मार्फत कर्ज स्पाने घरे बांधुन देण्याबाबत.

ठराव क्र. ४२७:

वरील विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने निर्णय घेतला की, कंधार जि. नांदेड येथील वैभवनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता औरंगाबाद मंडळामार्फत कर्जरुपाने घरे बांधुन देण्याबाबतचा प्रस्ताव शिफारशीसह प्राधिकरणास त्वरीत पाठवावा.

विषय क्र. ६:- फायब्रोटेक दरवाजे मंडळाच्या योजनाकरिता वापरणे बाबत.

ठराव क्र. ४२८:

वरील विषयावर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, मंडळाच्या उप अभियंत्याने सेलू जि. परभणी येथील फायब्रोटेक इंडस्ट्रीज ला भेट दयावी. तेथे तयार होणा-या

दरवाज्याची प्रत [QUALITY ] पाहून सदर दरवाजे मंडळाच्या मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गट योजनामध्ये वापरण्याबाबत अहवाल सादर करावा.

तसेच मंडळाच्या योजनामध्ये सध्या वापरात असणा-या दरवाजाशी तुलना करून, त्याबाबतची टिप्पणी पुढील बैठकीत सादर करावी.

यानंतर मा.सभापतीचे परवानगीने सभा संपली.

....

गा.